N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** गडचिरोली **P.S.(ठाणे):** कुरखेडा
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0049 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**26/02/2026 21:24

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** गुरूवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिनांक पासून):** 26/02/2026
**Date To ( दिनांक पर्यंत):** 26/02/2026
**Time From (वेळेपासून):** 12:15 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:35 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 26/02/2026 **Time (वेळ):** 21:24 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 032
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 26/02/2026 21:24 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** श्रीराम वार्ड, कुरखेडा ,कुरखेडा , 441209

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): विक्रांत अशोकराव सगणे

(b) **Father's Name** (वडील चे नाव) : अशोकराव सगणे

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1983

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | ला प्र विभाग, गडचिरोली,गडचिरोली,गडचिरोली,गडचिरोली,गडचिरोली, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | ला प्र विभाग, गडचिरोली,गडचिरोली,गडचिरोली,गडचिरोली,गडचिरोली, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय): पोलीस अधिकारी

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-7722077607

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुलोचना विठ्ठलराव कन्नाके | | वडील का नाम : विठ्ठलराव कन्नाके | 1. कोरेगाव,देसाईगंज ,देसाइगंज, गडचिरोली,महाराष्ट्र,भारत-441207 |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि | ध्वनी उपकरणे | सन्डीक्स कंपनीचे 32 जिबी मेमरी | 0.00 |

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| | इलेक्ट्रॉनिक सामान | | कार्ड 02 नग | |
| 2 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | मोबाईल फोन | आलोसे यांचा वन प्लस कंपनीचा अन्ड्राईड मोबाईल फोन | 15,000.00 |
| 3 | कागदपत्रे आणि मुल्यवान रोखे | इतर कोणतीही कागदपत्रे | भुमापन क्र. 76/6 मौजा जाभुळखेडा श्री बळवंत बुधाजी कोटांगले यांचे नावे असलेला विना सहीचा 7/12 प्रत | 0.00 |
| 4 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/ रू. ची 1 नोट | 500.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

15,500.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद पोस्टे कुरखेडा दिनांक 26/02/2026

मी विक्रांत अशोकराव सगणे, वय 43 वर्षे, व्यवसाय- नोकरी पोलीस उप अधीक्षक, नेमणूक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोली मो. नं. 7722077607 समक्ष पोलीस स्टेशन कुरखेडा येथे हजर येवुन सरतर्फे फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोली येथे दि. 06/10/2025 रोजी पासुन उपअधीक्षक म्हणुन कार्यरत आहे.

दिनांक 25/02/2026 रोजी तक्रारदार श्री बळवंत बुधाजी कोटांगले, वय 54 वर्षे, धंदा- शेती, रा. जांभुळखेडा ता. कुरखेडा जि. गडचिरोली त्यांचे मो. नं. 9923675785 वरून यांनी आम्हास वरील नमुद क्रमांकावर फोन करून त्यांची एका लोकसेवकाविरूध्द तक्रार असल्याचे सांगीतले त्यावरून आम्ही त्यांना मौजा गोठणगांव जवळील कुरखेडा ते मालेवाडा कडे जाणा-या रोडच्या कडेला हजर राहण्यास सांगुन, सापळा कारवाईतील पथक व सापळा कारवाईकरीता लागणारे सर्व साहीत्य सोबत घेवुन शासकीय वाहनासह लाप्रवि कार्यालय गडचिरोली येथुन रवाना होवुन कार्यवाहीकरीता लागणारे दोन शासकीय पंच वनपरिक्षेत्र अधिकारी प्रादेशिक वडसा येथून पाचारण करून मौजा गोठणगाव जवळील कुरखेडा ते मालेवाडा कडे जाणा-या रोडच्या कडेला पोहचलो. त्यावेळी गोठणगांव जवळ कुरखेडा ते मालेवाडा जाणा-या रोडच्या कडेला तक्रारदार हजर होते. त्यानंतर त्यास आम्ही आमची, दोन्ही शासकीय पंच व सापळा पथकातील सदस्याची ओळख करून दिली. त्यानंतर त्यांनी त्यांचे नाव बळवंत बुधाजी कोटांगले असे सांगीतले. त्यावेळी रोडच्या कडेला बंद स्थितीत असलेल्या गॅस गोडावुन आवारात कॅम्प लावले. त्यानंतर त्यांनी त्यांच्या तक्रारीचे तोंडी हकीकत सांगीतली. त्यानंतर त्यांना कागद व पेन उपलब्ध करून दिले असता त्यांनी त्यांचे स्वहस्ताक्षरात तक्रार लिहुन आमचेकडे दिली. ती, खालीलप्रमाणे

मी समक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली कॅम्प गोठणगांव येथे आज दिनांक 25/02/2026 रोजी हजर येवुन तक्रार देतो की, मी वरीलप्रमाणे राहावयास असुन शेती व्यवसाय करून कुटूंबाचा उदरनिर्वाह करतो.

माझ्याकडे 1.25 हे. आर. शेतजमीनीचा वनपट्टा मौजा जांभुळखेडा येथे असुन त्याचा आफलाईन 7/12 माझे नावे आहे. सदर शेत जमीनीवर होणा-या पेरणीची ''ई'' पिक नोंदणी करणे करीता आनलाईन पध्दतीने 7/12 काढणे आवश्यक असल्याने, मी त्याबाबत तलाठी कार्यालय गोठणगांव येथे आक्टोबर 2024 (तारीख आठवत नाही) मध्ये नोंदणीच्या प्रक्रीयेकरीता कागदपत्रे तलाठी यांचेकडे दिले होते. त्यानंतर 28/01/2026 रोजी मी तलाठी कार्यालय गोठणगांव येथे जावुन श्रीमती कन्नाके मॅडम, तलाठी यांना आनलाईन 7/12 ची प्रत मागीतली असता त्यांनी मला आनलाईन 7/12 काढुन सही शिक्क्यानिशी प्रत देण्याकरीता 500/- रूपये लाचेची मागणी केली. त्यावेळी माझेकडे पैसे नाही असे त्यांना मी सांगीतल्याने त्यांनी मला ''पैशाची व्यवस्था झाल्यावर एक

महीन्यानंतर कार्यालय गोठणगांव येथे येवुन भेटा'' असे म्हणुन मला पैशाची मागणी केली होती.
श्रीमती कन्नाके मॅडम, तलाठी कार्यालय गोठणगांव यांनी मला ''ई'' पिक नोंदणी करणे करीता आनलाईन पध्दतीने 7/12 ची सही शिक्क्यानिशी प्रत देण्याकरीता एकमहीण्यापुर्वी 500/- रूपये लाचेची मागणी केली असल्याने, व ती लाच रक्कम असल्याची माझी खात्री आहे. ती रक्कम देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्याने व आज जवळपास एक महीना पुर्ण होत असुन मी आज श्रीमती कन्नाके मॅडम, तलाठी यांचेकडे आनलाईन 7/12 ची प्रत घेण्याकरिता जात असुन त्या मला पुन्हा 500/- रू. लाचेची मागणी करतील याची मला खात्री आहे. जर त्यांनी लाचेची मागणी केली तर आपले कार्यालयामार्फत कार्यवाही होणे करीता स्वेच्छेने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोली कॅम्प गोठणगांव येथे तक्रार देण्यास आलो आहे.
श्रीमती कन्नाके मॅडम, तलाठी कार्यालय गोठणगांव यांचेशी माझे कोणताही वैयक्तीक वैर नसुन आर्थिक देवाण-घेवाण अथवा भांडण नाही. म्हणुन मी त्यांचेविरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्याकरीता स्वेच्छेने तक्रार देत आहे. अशा मजकुराची तक्रार दिली आहे. तक्रारदार बळवंत कोटांगले यांनी दिलेली लेखी तक्रार पंचाना दाखविली. त्यांनतर तक्रारदार यांनी दिलेल्या लेखी तक्रार व सोबत जोडलेल्या आफलाईन सातबा-यावर तक्रारदार बळवंत कोटांगले यांनी, पंचानी व मी सहया करून तक्रार ताब्यात घेतली. तक्रारदार यांनी तलाठी कार्यालय गोठणगांव येथील तलाठी यांचे विरूध्द दिलेली लेखी तक्रार खरी आहे किंवा नाही यांची खात्री करण्यासाठी दि. 25/02/2026 रोजी लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय घेण्यात आला.
त्यानंतर तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकास सविस्तर सुचना देवुन माझे सुचनेवरून पोअं घोरमोडे यांनी व्हाईस रेकार्डरमध्ये एक नविन मेमरी कार्ड टाकुन त्यामध्ये पुर्वीचे कोणतेही संभाषण नसल्याची खात्री दिली. त्यांनतर व्हाईस रेकार्डर सुरू करून त्यामध्ये आमचे, दोन्ही पंच व तक्रारदार बळवंत कोटांगले यांचे वक्तव्य घेवुन व्हाईस रेकार्डर तक्रारदार यांचे शर्टचे आतील इनरला लटकवुन दिला व पंच क्र. 1 श्रीमती पेंदाम सह श्रीमती कन्नाके मॅडम तलाठी यांची भेट घेण्यासाठी गोठणगांव येथील तलाठी कार्यालय जवळच असल्याने पायदळ जाण्यास रवाना करण्यात आले व त्यांचे परत येण्याची प्रतिक्षेत आम्ही, पंच क्र. 2 व सापळा पथक त्यांच ठिकाणी थांबुन राहीलो. त्यानंतर थोडया वेळात तक्रारदार बळवंत कोटांगले व पंच क्र. 1 श्रीमती पेंदाम असे आम्ही थांबुन असलेल्या सुरक्षीत ठिकाणी परत आले. तेव्हा तक्रारदार यांचे जवळील व्हाईस रेकार्डर माझे सांगणेवरून पोअं घोरमोडे यांनी पंच क्र. 1 यांचे वक्तव्य घेवुन बंद केला. व्हाईस रेकार्डर मध्ये रेकार्ड झालेले संभाशण आम्ही तक्रारदार व पंचासमक्ष ऐकले. त्यामध्ये कन्नाके मॅडम यांनी ''ई'' पिक नोंदणी करणे करीता आनलाईन पध्दतीने 7/12 ची सही शिक्क्यानिशी प्रत देण्याकरीता "फक्त आता काही फी लागेल, सातबारा बनवलोन त्याची नाही का 500/- रू. घेतोन " असे म्हणून 500/- रूपयाची लाचेची मागणी करून तलाठी कार्यालय गोठणगांव येथे दि. 26/02/2026 रोजी स्वीकरण्याची तयारी दर्शविल्याने दोन्ही पंचासमक्ष लाच पडताळणी कारवाई दरम्यान निष्पन्न झाले. त्यावरून आम्ही सर्वानुमते श्रीमती कन्नाके तलाठी यांचे विरूध्द उदईक रोजी सापळा कारवाई करण्याचे ठरवुन तक्रारदार यांना दि. 26/02/2026 रोजी 10.30 वा. पुढील कारवाई करण्याकरीता सदर ठिकाणी हजर येण्यास सांगुन आम्ही, सापळा पथक व दोन्ही पंचासह शासकीय वाहनाने रवाना होवुन लाप्रवि कार्यालय गडचिरोली येथे पोहचुन पंचनामा कार्यवाही पुर्ण करून दोन्ही पंचाना गोपणीयता भंग होवु न देण्याच्या तसेच उदईक रोजी 10.00 वा बस स्टॅंड वडसा येथे हजर राहण्याच्या सुचना देवुन त्यांना घरी जाण्यास रवाना केले. सापळा पथकास सुध्दा गोपणीयतेच्या सुचना देवुन दि. 26/02/2026 रोजी कार्यालयात हजर येण्याच्या सुचना दिल्या. तसा सविस्तर पंचनामा करण्यात आला.
त्यानतर आम्ही, सापळा पथक व सर्व साहीत्यासह दि. 26/02/2026 रोजी 9.30 वा. लाप्रवि कार्यालय गडचिरोली येथून शासकीय वाहनाने रवाना होवुन मौजा वडसा येथे पोहचुन 10.45 वा. दोन्ही पंचाना सोबत घेवुन मौजा गोठणगांव जवळील कुरखेडा ते मालेवाडा कडे जाणा-या रोडच्या कडेला बंद स्थितीत असलेल्या गॅस गोडावुनच्या कंम्पाउंड मध्ये 11.30 वा. पोहचलो. त्यावेळी तक्रारदार तिथे हजर होते. त्यानंतर तक्रारदार यांनी श्रीमती कन्नाके मॅडम हया मिटींग कामी तहसिल कार्यालय कुरखेडा येथे असुन त्या दुपारपर्यंत येत असल्याचे तक्रारदार यांनी कळविल्याने तिथेच थांबून राहीलो. त्यांनतर 13.30 वा. चे सुमारास आमचे सुचनेवरून पोअं प्रविण जुमनाके यांनी अंथ्रासीन पावडरची व अल्ट्राव्हायलेट लाईटच्या गुणधर्माची माहीती देवुन तक्रारदार व पंचाना त्याचे प्रात्याक्षीक दाखविले. तक्रारदार यांनी त्यांचे बचतीतील हजर केलेली पाचषे रू. दराची 1 नोटेचा क्रमांक नोंद करून, एकुण 500/- रू. रक्कमेच्या नोटेला अथ्रासीन पावडर लावली. सदरील अँथ्रासीन पावडर लावलेली नोट तक्रारदार यांच्या सर्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिशात ठेवली. व आम्ही तक्रारदार व पंचाना पुन्हा सविस्तर सुचना देवुन श्रीमती कन्नाके, तलाठी यांनी लाच स्विकारल्यानंतर खांदयांवरील दुपटयाने तोंडाला पुसून इशारा करणेबाबत तक्रारदार यांना सुचना दिली. तसेच सापळा पथकामधील सर्वांना त्यांचे काम समजावुन सांगून तष्पा सुचना देण्यात

आल्या.

त्यानंतर माझे सुचनेवरून पोअं घोरमोडे यांनी 13.50 वा. व्हाईस रेकार्डर सुरू करून माझे, तक्रारदार व पंचाचे वक्तव्य घेवुन तक्रारदार यांचे षर्टाच्या आतील इनरला लटकवून तक्रारदार बळवंत कोटांगले यांना पंच क्र. 1 श्रीमती पेंदाम यांचे सोबत पायदळ चालत जावुन श्रीमती कन्नाके मॅडम यांना भेटण्यासाठी गोठणगांव येथील तलाठी कार्यालयात पाठविण्यात आले. त्यांच्या पाठीमागे मी, सापळा पथक व पंच क्र. 2 घनष्याम बांगरे असे गोठणगांव येथील तलाठी कार्यालयाच्या परीसरात आडोसा घेवुन एकमेकांना दिसतील अषा रितीने सापळा लावुन थांबलो. त्यानंतर कार्यालयाचे षटर बंद असलयाने तक्रारदाराने कोणताही पूर्व नियोजित इषारा न करता पंचासह कॅम्प लावलेल्या ठिकाणाकडे परत जाण्यास निघाल्याने आम्ही, व सापळा पथक पंच क्र. 2 सह कॅम्प लावलेल्या ठिकाणी परत आलो. तेव्हा तक्रारदार यांनी पंचासमक्ष त्यांचे मोबाईल क्र. 9923675785 वरून श्रीमती कन्नाके, तलाठी यांना त्यांचे मोबाईल क्र. 9403453570 वर फोन केला असता श्रीमती कन्नाके यांनी तक्रारदार यांना कुरखेडा येथे येण्यास सांगून, पोहचल्यावर पुन्हा फोन करण्यास सांगितले वरून आम्ही, तक्रारदार, सापळा पथक व पंचासह कुरखेडा येथे पोहचून पुढील कार्यवाही करण्याचा निर्णय घेतला.

त्यानंतर कुरखेडा येथे पोहचुन आमचे सुचनेवरून पोअं घोरमोडे यांनी 14.48 वा. व्हाईस रेकार्डर सुरू करून माझे, तक्रारदार व पंचाचे वक्तव्य घेवुन तक्रारदार यांनी पंचासमक्ष त्यांचे मोबाईल क्र. 9923675785 वरून श्रीमती कन्नाके, तलाठी यांना त्यांचे मोबाईल क्र. 9403453570 वर दोनदा फोन केला असता त्यांनी फोन उचलला नाही. त्यानंतर काही वेळातच श्रीमती कन्नाके यांचा तक्रारदारास फोन आला तेव्हा श्रीमती कन्नाके यांनी तक्रारदार यांना अध्र्या तसानंतर श्रीराम वार्डातील साई मंदिर जवळ गणपत सोनकुसरे यांचे त्या किरायाणे राहत असलेल्या घरी येण्यास सांगीतले.

त्यानंतर श्रीमती कन्नाके तलाठी यांचा तक्रारदारास पुन्हा 15.09 वा. फोन आल्याने पोअं घोरमोडे यांनी व्हाईस रेकार्डर सुरु करून त्यांचे घरी सातबारा घेण्याकरीता बोलाविल्याने तक्रारदार यांचे शर्टाच्या आतील इनरला व्हाईस रेकार्डर लटकवून तक्रारदार बळवंत कोटांगले यांना पंच क्र. 1 श्रीमती पेंदाम यांचे सोबत पायदळ चालत जावुन श्रीमती कन्नाके मॅडम राहत असलेल्या घरी भेट घेण्यास पाठविण्यात आले. त्यांच्या पाठीमागे आम्ही, सापळा पथक व पंच क्र. 2 घनष्याम बांगरे असे श्री सोनकुसरे यांचे घराचे आजुबाजूला आडोसा घेवुन एकमेकांना दिसतील अषा रितीने सापळा लावुन थांबलो.

त्यानंतर तक्रारदार यांनी पंच क्र. 1 सह श्रीमती कन्नाके, तलाठी राहत असलेल्या घराचे बाहेर येवुन लाच रक्कम स्विकारल्याचा 15.35 वा. नियोजित इषारा केला. त्याचवेळी आम्ही, सापळा पार्टीतील सर्व सदस्य व पंच क्र. 2 यांचेसह घटनास्थळी पोहचलो व पोअं घोरमोडे यांचे करवी तक्रारदारकडील व्हाॅईस रेकाॅर्डर बंद करून ताब्यात घेतला. त्यानंतर पंच क्र. 1 श्रीमती पेंदाम यांना लाचेची रक्कम कोणी मागीतली व कोणी स्विकारली असे विचारले असता, त्यांनी तेथे हजर असलेल्या गळयात ओळखपत्र व पांढरा सलवार घातलेल्या महीले कडे बोट दाखवुन हिच तलाठी कन्नाके मॅडम असुन यांनी तक्रारदार बळवंत कोटांगले यांना सातबा-याची सही शिक्याची प्रत देवुन इषारा करून लाचेची रक्कम संगणक टेबलवर ठेवण्यास सांगून लाच स्विकारली आहे. तलाठी कन्नाके यांना लाचेच्या रक्कमेसह मपोषि जोत्सना यांचे मार्फत रंगेहात पकडण्यात आले. त्यांनतर मी श्रीमती कन्नाके तलाठी यांना आमची, दोन्ही पंचाची व सापळा पथकाची ओळख करून दिली. त्यानंतर श्रीमती कन्नाके यांना त्यांचे नाव गाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव कु. सुलोचना विठ्ठलराव कन्नाके, यांना त्यांचे नाव गाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव कु. सुलोचना विठ्ठलराव कन्नाके, वय 38 वर्श, व्यवसाय नोकरी, पद- ग्राम महसुल अधिकारी (तलाठी) गोठणगांव ता. कुरखेडा जिल्हा गडचिरोली मुळ पत्ता- रा. कोरेगांव ता. देसाईगंज (वडसा) जिल्हा गडचिरोली, ह.मु. कुरखेडा श्रीराम वार्ड, साई मंदिर जवळ, गणपत सोनकुसरे यांचे घरी किरायाणे ता. कुरखेडा जि. गडचिरोली असे सांगीतले. त्यानंतर पंच क्र. 2 घनष्याम बांगरे यांनी तलाठी श्रीमती कन्नाके यांच्या खोलीतील संगणक टेबलवरील लाचेची रक्कम 500/- रू. काढून घेवुन सादर नोटेचा क्रमांक व तक्रारदाराने लाच रक्कम म्हणुन दिलेल्या नोटेचा क्रमांक एकच असल्याची खात्री केली. तसेच आमचे सुचनेवरून तलाठी श्रीमती कन्नाके यांचे दोन्ही हात, लाचेची रक्कम व संगणक टेबल अल्ट्राव्हायलेट लॅम्पच्या सहायाने तपासणी केली असता तलाठी श्रीमती कन्नाके उजवा हात, लाचेची रक्कम व संगणक टेबलवर ठिक ठिकाणी फिक्कट निळसर हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर सदर 500/- रू. लाचेची रक्कम पंचासमक्ष लाखेने सिल मोहर करून जप्त करण्यात आले. त्यानंतर पुन्हा माझे सुचनेवरून तक्रारदार बळवंत कोटांगले यांचे हात व षर्टाचे समोरील डाव्या बाजुचा खिसा अल्ट्राव्हायलेट लॅम्पच्या साहायाने तपासणी केली असता तक्रारदार यांचे उजव्या हातावर व षर्टाचे समोरील डाव्या बाजुच्या खिष्याच्या तोंडावर व आतमध्ये ठिक ठिकाणी फिक्कट निळसर हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर मी, सापळा पथक, दोन्ही पंच, आलोसे कु. कन्नाके (ग्राम महसुल अधिकारी) असे पोलीस स्टेषन कुरखेडा येथे आलो.

त्याबाबत तसा सविस्तर यषष्वी सापळा पंचनामा करण्यात आला.
तरी यातील तक्रारदार बळवंत कोटांगले यांनी दि. 25/02/2026 रोजी दिलेल्या तक्रारीच्या अनुशंगाने दि. 25/02/2026 रोजी यातील आलोसे कु. सुलोचना विठ्ठलराव कन्नाके, ग्राम महसुल अधिकारी यांनी पंच क्र. 1 श्रीमती पेंदाम यांचे समक्ष तक्रारदार यांचेकडे ''ई'' पिक नोंदणी करणे करीता आनलाईन पध्दतीने 7/12 ची सही शिक्क्यानिशि प्रत देण्याकरीता 500/- रू. लाचेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केले. त्यानंतर त्यांनी दि. 26/02/2026 रोजी 15.35 वा. च्या सुमारास कुरखेडा येथील श्रीराम वार्डातील साई मंदिर जवळ गणपत सोनकुसरे यांचे किरायाणे राहत असलेल्या घरी पंच क्र. 1 श्रीमती पेंदाम यांचे समक्ष इशा-याव्दारे संगणक टेबलवर 500/- रू. लाच रक्कम ठेवण्यास सांगून सदर लाच रक्कम स्विकारली म्हणुन माझी कु. सुलोचना विठ्ठलराव कन्नाके, वय 38 वर्ष, व्यवसाय नोकरी, पद- ग्राम महसुल अधिकारी, गोठणगांव ह.मु. कुरखेडा येथील श्रीराम वार्ड, साई मंदिर जवळ, गणपत सोनकुसरे यांचे घरी किरायाणे ता. कुरखेडा जि. गडचिरोली यांचे विरूध्द कलम 7 भ्र. प्र. अधिनियम 1988 प्रमाणे कायदेशिर फिर्याद आहे.
( विक्रांत सगणे )
पोलीस उपअधीक्षक,
ला. प्र. विभाग, गडचिरोली

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
priyanka rajkumar aghav
**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.): WAPI
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): MAHENDRA BABURA
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 15101000402MBWM87

पोलीस ठाणे अमलदार
पोलीस स्टेशन कुरखेडा,
जि. गडचिरोली

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): **Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)